सत्यमेव जयते

# सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती.

शासकीय तंत्रनिकेतन परिसर, गाडगेनगर, अमरावती.

**Ph.No** : (0721) 2573027, 2572577
**Email**: roamravati@dtemaharashtra.gov.in

**Website**: www.jdroamt.org
**Fax No**: (0721) 2577913


क्रमांक :- विकाअ/शिक्षण /२०२५/1328
दिनांक :- 07 MAY 2025

**प्रति,**

**प्राचार्य,**
सर्व व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्था,
अमरावती विभाग, अमरावती.

**विषय :- मागासवर्गीय घटकातील विद्यार्थ्यांसाठी इतर मागास बहुल कल्याण विभागाच्या क्र. शिवृत्ती-२०२३ / प्र क्र. १३५/प्र.क्र. २२१ / शिक्षण दि. २०/०९/२०२४ रोजीच्या शासन शुध्दीपत्रकाची प्रभावी अंमलबजावणी करण्याबाबत.**

**संदर्भ :-** मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा.मुंबई यांचे पत्र क्रमांक : १८/तंशिस/डीबीटी/विकाप/२०२५/२४६ दिनांक : २८.०४.२०२५

उपरोक्त विषयाबाबत आपणास कळविण्यात येते की, मा. श्री. रविंद्र चव्हान, विधानसभा सदस्य यांचे पत्र सोबत जोडलेले पत्र व संदर्भीय तंत्रशिक्षण संचालनालयाचे संदर्भीय पत्र सोबत जोडले असून इतर मागास बहुजन कल्याण विभाग, शासन शुध्दीपत्र क्र. शिवृत्ती-२०२३/प्र.क्र. १३५/ शिक्षण-१, दिनांक २०/०९/२०२४ नुसार विमुक्त जाती भटक्या जमाती, इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी असलेली शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क प्रतिपुर्ती योजना करीता नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र बंधनकारक करणेबाबत मान्यता दिलेली आहे. परंतू, अद्यापही या आदेशाची अंमलबजावणी संबंधीत शासकीय , अशासकीय व शासनमान्य खाजगी विना-अनुदानित व कायम विना-अनुदानित महाविद्यालये / तंत्रनिकेतन यांचेमार्फत होत नसल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे सदर आदेशाती काटेकोरपणे आपल्या महाविद्यालयात व तंत्रनिकेतनामध्ये अंमलबजावणी करावी.

तेव्हा इतर मागास बहुजन कल्याण विभाग, शासन शुध्दीपत्रक क्र. शिवृत्ती-२०२३/प्र.क्र.१३५ / शिक्षण-१ दि. २०/९/२०२४ रोजीचे शासन शुध्दीपत्रक सोबत जोडलेले असून शुध्दीपत्रकानुसार अंमलबजावणी आपल्या संस्थेत करावी, याची कटाक्षाने नोंद घेण्यात यावी.

**सहपत्रे :- वरीलप्रमाणे.**

**(मनोज. म अंधारे)**
प्र.सहसंचालक तंत्रशिक्षण,
अमरावती.

**प्रत :- प्रोग्रामर,** तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना संकेतस्थळावर टाकण्यासाठी.

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य.

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४८६

ई-मेल—desk18@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

तात्काळ : स्पीडपोस्ट /ई-मेलद्वारे

क्र.:- १८/तंशिसं/डीबीटी/विकाप/२०२५/ २४६

दिनांक:- 21/04/2025

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई/पुणे/नाशिक/छत्रपती संभाजीनगर/अमरावती/नागपूर

**विषय:- मागासवर्गीय घटकातील विद्यार्थ्यांसाठी इतर मागास बहुल कल्याण विभागाच्या क्र. शिवृत्ती-२०२३/ प्र.क्र.१३५/प्र.क्र.२२१/शिक्षण दि. २०/०९/२०२४ रोजीच्या शासन शुध्दीपत्रकाची प्रभावी अमलबजावणी करण्याबाबत.**

संदर्भ:-१. उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे प्रत्र क्र. संकिर्ण-२०२५/प्र.क्र.५०/तांशि-४, दि.१८/०३/२०२५

२. मा. रविद्र चव्हाण यांनी मा. ना. श्री. चंद्रकांत पाटील, मंत्री उच्च व तंत्रशिक्षण यांना उद्देशून लिहिलेले जा. क्र. १२२/२०२५, दि. ०४/०२/२०२५ रोजीचे पत्र.

३. इतर मागास बहुजन कल्याण विभाग, शासन शुध्दीपत्रक क्र. शिवृत्ती-२०२३/प्र.क्र.१३५/शिक्षण-१, दि. २०/०९/२०२४.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, मा. श्री. रविंद्र चव्हाण, विधानसभा सदस्य यांचे पत्र संदर्भीय क्र. १ नुसार संचालनालयास प्राप्त झाले असून इतर मागास बहुजन कल्याण विभाग, शासन शुध्दीपत्रक क्र. शिवृत्ती-२०२३/ प्र.क्र.१३५/शिक्षण-१, दि. २०/०९/२०२४ नुसार विमुक्त जाती भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी असलेली शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती योजनाकरीता नॉन-क्रिमिलेअर प्रमाणपत्र बंधनकारक करणेबाबत मान्यता दिलेली आहे. परंतू, अद्यापही या आदेशाची अंमलबजावणी संबंधित शासकीय, अशासकीय व शासनमान्य खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित महाविद्यालय/तंत्रनिकेतन यांचे मार्फत होत नसल्याचे निदर्शनास आले आहे. याबाबत तपासून अवगत करावे असे नमुद केले आहे.

तरी याबाबत सर्व विभागीय कार्यालयांना कळविण्यात येते की, आपल्या अखत्यारीत येणाऱ्या सर्व संस्थांना संदर्भ क्र. ३ दि. २०/०९/२०२४ रोजीच्या शासन शुध्दीपत्रकानुसार अंमलबजावणी करण्याबाबत कळविण्यात यावे. याबाबत केलेल्या कार्यावाहीचा अहवाल या संचालनालयास तात्काळ पाठवावा.

सोबत: १. मा. रविद्र चव्हाण, विधानसभा सदस्य यांचे पत्र.
२. दि. २०/०९/२०२४ रोजीचे शासन शुध्दीपत्र.

सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय, अमरावती
जा.क्र. 2036 दिनांक 5/5/25

(डॉ. विनोद म. मोहितकर)
संचालक,
तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई.

प्रत. मा. अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, ४ था मजला, मुंबई-३२ यांना माहितीसाठी. (लक्षवेध-श्री. अजितकुमार थोरात, कक्ष अधिकारी)

0 6 FEB 2025 ७७/नाशी-४ २७/०२/२५

# रविंद्र चव्हाण

कार्यकारी अध्यक्ष - भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र प्रदेश
विधानसभा सदस्य - १४३ डोंबिवली (जि. ठाणे)
माजी मंत्री, महाराष्ट्र राज्य

जा.क्र. ११२/२०२५,

जा.क्र. मंत्री/उ.व तंत्र शि., .सं.कार्य/ व्ही.आय.पी./मुं./ 7887610 12-02-25

दिनांक : ०४-०२-२०२५

प्रति,

मा.ना.श्री. चंद्रकांत (दादा) सरस्वती बच्चू पाटील,
मंत्री, उच्च व तंत्रशिक्षण,
महाराष्ट्र राज्य,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

अ.मु.स. उच्च व तंत्र शिक्षण यांचे कार्यालय क्र. 7887610 दि. 17/02/25

अ.मु.स (उच्च व तंत्र) सचिवांना साद करावे

[चंद्रकांत (दादा) पाटील] मंत्री

विषय :- मागासवर्गीय घटकातील विद्यार्थ्यांसाठी इतर मागास बहुल कल्याण विभागाच्या क्र.शिवृत्ती-२०२३/प्र.क्र.१३५/प्र.क्र.२२१/ शिक्षण-१, दिनांक २०.०९.२०२४ रोजीच्या शासन शुध्दीपत्रकाची प्रभावी अंमलबजावणी करण्याबाबत.

महोदय,

राज्यातील शासकीय, अशासकीय अनुदानित व शासन मान्यता प्राप्त खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदातिन महाविद्यालये / तंत्रनिकेतने आणि शासकीय विद्यापीठात विनाअनुदानित तत्वावर सुरु असलेल्या निवडक व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घतलेल्या विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी असलेली शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क प्रतिपर्ती योजनाकरिता सन २०२७-२०१८ या शैक्षणिक वर्षापासून रुपये ६.०० लक्ष वरुन रुपये ८.०० लक्ष करण्याची अट रद्द करुन त्याऐवजी नॉन-क्रिमीलेयर प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक करण्यास शासनाच्या इतर मागास बहुल कल्याण विभागाच्या क्र.शिवृत्ती-२०२३/प्र.क्र.१३५/प्र.क्र.२२१/शिक्षण-१, दिनांक-२०.०९.२०२४ रोजीच्या शासन शुध्दीपत्रकान्वये मान्यता दिलेली आहे.

परंतू, अद्यापही या आदेशाची अंमलबजावणी संबंधित शासकीय, अशासकीय व शासनमान्य खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित महाविद्यालये / तंत्रनिकेतन यांचे मार्फत होत नसल्याचे निदर्शनास आले आहे. ही बाब मागासवर्गीय घटकातील विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी अन्यायकारक असल्यामुळे विद्यार्थी हितास्तव उक्त आदेशांची तातडीने प्रभावी अंमलबजावणी सुरु करण्याकरिता सर्व संबंधितांना आपल्या स्वरावरुन आदेश व्हावेत, अशी आपणांस विनंती आहे.

आपला,

(रविंद्र चव्हाण)

स.स. (नाशी)

DTE कडून वस्तुस्थितीदर्शक अहवाल मागवावा.

कार्यालय : सी. डी. ओ. बॅरक नं. १, वसंतराव भागवत चौक, योगक्षेमसमोर, नरिमन पॉईंट, मुंबई - ४०० ०२०. दुरध्वनी : ०२२-२२०२२०५०/२२०४८६८७
मतदारसंघ कार्यालय : जाणता राजा स्वातंत्र्यवीर सावरकर उद्यान, वीर सावरकर रोड, डोंबिवली पूर्व, जि. ठाणे - ४२१ २०१.
Web. : www.ravindrachavan.in E-mail : ravindrachavan.mla@gmail.com

विमुक्त जाती भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी असलेली शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती योजनाकरिता नॉन -क्रिमीलेअर प्रमाणपत्र बंधनकारक करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
इतर मागास बहुजन कल्याण विभाग,
शासन शुध्दीपत्रक क्रमांक : शिवृत्ती-२०२३/प्र.क्र.१३५/शिक्षण-१
मोती महल, २ रा मजला, १९५,जे. टाटा रोड, चर्चगेट,मुंबई-४०००२०
दिनांक : २० सप्टेंबर, २०२४.

संदर्भ- १) शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्र. इबीसी-२०१६/प्र.क्र.२२१/ शिक्षण-१, दिनांक ३१ मार्च, २०१६
२) शासन निर्णय, इतर मागास बहुजन कल्याण विभाग, क्रमांकः इबीसी-२०१७/ प्र.क्र.२७/ शिक्षण, दिनांक ०१ जानेवारी, २०१८

शासन शुध्दीपत्रक

संदर्भाधीन शासन निर्णय क्र.२ येथील परिच्छेद क्र.१ मध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

"राज्यातील शासकीय, अशासकीय अनुदानित व शासन मान्यता प्राप्त खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित महाविद्यालये/तंत्रनिकेतने आणि शासकिय विद्यापीठात विनाअनुदानित तत्वावर सुरु असलेल्या निवडक व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेतलेल्या विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्ती योजनेंतर्गत पालकांची वार्षिक उत्पन्न मर्यादा सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षापासून रुपये ६.०० लक्ष वरुन रुपये ८.०० लक्ष करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे"

सदर शासन निर्णयातील उपरोक्त मजकुरा ऐवजी खालीलप्रमाणे वाचावे.

"राज्यातील शासकीय, अशासकीय अनुदानित व शासन मान्यता प्राप्त खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित महाविद्यालये/तंत्रनिकेतने आणि शासकिय विद्यापीठात विनाअनुदानित तत्वावर सुरु असलेल्या निवडक व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेतलेल्या विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी असलेली शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती योजनाकरिता उत्पन्नाची अट रद्द करण्यात येत असून त्याऐवजी नॉन-क्रिमीलेयर प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे."

सदर शासन शुध्दीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेताक २०२४०९२३१५५४३७४८३४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

PRAKASH SHRIDHAR DHAWLE

(डॉ. प्रकाश धावले)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मा.राज्यपाल महोदयांचे सचिव, राजभवन, मुंबई.
२) मा. मुख्यमंत्री महोदयांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.